**सं.फौ.ख.क्र. ६७६/२०१८**
**गौतमकुमार जवेरीलाल –वि– सचिन गवळी**
**निशाणी क्र. ४० खाली.**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ गौतमकुमार जवेरीलाल डूंगरवाल यांचा शपथेवर ज्यादाचा सरतपास फिर्यादीचे वकील श्री. व्ही. व्ही. जाधव यांच्यातर्फे सुरु**

१. मी प्रस्तुतकामी मुळ चेक, मुळ रिटन मेमो, बँकेत भरणा केल्याची मुळ पावती, आरोपीला पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत, पोस्टाची मुळ पावती, आरोपीला नोटीस मिळाल्याची मूळ पोहोच पावती दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. प्रस्तुतकामी चेक रिटन मेमो व चेक बँकेत जमा केल्याच्या पावतीला निशाणी देण्यास आरोपीचे वकील श्री. वाघचौरे यांनी आक्षेप नोंदवला की, त्यावर कोणाचीही सही नाही व तो चेक रिटर्न मेमो झेरॉक्स आहे. मात्र प्रस्तुतकामी दाखल चेक रिटर्न मेमो कंम्प्युटर जनरेटेड आहे. तो चेक रिटर्न मेमो पाहिला असता तो मूळ नसल्याचे दिसते. त्यामुळे आरोपीच्या वकीलांचा आक्षेप मंजूर करण्यात येतो व त्याला निशाणी देता येणार नाही. त्याला **आर्टीकल ए** देण्यात येते. प्रस्तुतकामी फिर्यादीने बँकेत चेक भरणा केल्याची पावती दाखल केलेली आहे. मात्र त्यावर कोणाचीही सही नाही. त्यामुळे त्याला निशाणी न देता **आर्टीकल बी** देण्यात येते. मूळ चेकला **निशाणी ४४**, आरोपीला पाठविलेल्या नोटीसच्या स्थळ प्रतला **निशाणी ४५**, पोस्टाची मूळ पावती **निशाणी ४६**, आरोपीला नोटीस मिळाल्याची मूळ पोहोच पावती **निशाणी ४७** देण्यात येते.

**ज्यादाचा सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. एस. एफ. वाघचौरे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

२. गौतमकुमार जवेरीलाल या फर्मचा मी एकटाच संचालक आहे. ती फर्म १ जानेवारी १९८९ रोजी स्थापन झाली. ती फर्म नोंदणीकृत आहे. हे म्हणणे खरे नाही की गौतमकुमार जवेरीलाल ही फर्म नोंदणीकृत असल्याचे व मी त्याचा प्रोप्रायटर असल्याचे दाखवण्यासाठी माझ्या तोंडी शब्दांव्यतिरिक्त माझ्याकडे कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की गौतमकुमार जवेरीलाल ही फर्म नोंदणीकृत असल्याचे व मी त्याचा प्रोप्रायटर असल्याचे दाखवणारे कोणतेही कागदपत्रे मी प्रस्तुतकामी दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की गौतमकुमार जवेरीलाल ही फर्म नोंदणीकृत असल्याचे व मी त्याचा प्रोप्रायटर असल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की गौतमकुमार जवेरीलाल या फर्मचे माझ्याकडे लायसन्स असल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे आहे की गौतमकुमार जवेरीलाल या फर्मचे माझ्याकडे व्यापारी लायसन्स आहे हे दाखवणारे कोणतेही कागदपत्र मी प्रस्तुतकामी दाखल केले नाहीत.

३. हे म्हणणे खरे आहे की दि.२५.०८.२०१८ रोजी आरोपीने माझ्याकडून रक्कम रुपये ३,०१,०००/- चा कांद्याचा माल विकत घेतला हे दाखवणारे कोणतेही कागदपत्र मी प्रस्तुतकामी दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की दि.२५.०८.२०१८ रोजी आरोपीने माझ्याकडून रक्कम रुपये ३,०१,०००/- चा कांद्याचा माल विकत घेतला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की कृषी उत्पन्न बाजारसमिती मध्ये लिलावामध्ये जो कांद्याचा माल खरेदी घेतला जातो त्याचेही रेकॉर्ड ठेवलेले असते. त्याची हिशोबपट्टी पावती, लिलावाची पावती, पैसे दिल्याची पावती, मार्केट फी भरल्याची पावती अशी कागदपत्रे असतात. मी चांदवड कांदा मार्केटमध्ये कांदा खरेदी करतो. हे म्हणणे खरे आहे की दि.२५.०८.२०१८ रोजी मी चांदवड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा खरेदी केला हे दाखवणारे कोणतेही कागदपत्र मी प्रस्तुतकामी दाखल केले नाहीत.

४. दि.२५.०८.२०१८ रोजी आरोपीने माझ्याकडून किती माल खरेदी केला व त्यावेळी त्याचा काय भाव ठरला होता याबाबतचे कोणतेही कथन माझ्या फिर्यादमध्ये व पुराव्याच्या शपथपत्रात नाही. ते का नमूद केले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझ्याकडे अशा प्रकारचा कोणताही कांद्याचा माल खरेदी केलेला नसल्यामुळेच त्याबाबतचे कथन माझ्या फिर्याद व पुराव्याच्या शपथपत्रात नमूद नाही.

५. एखाद्या व्यक्तीने आमच्याकडून कांदा खरेदी केल्यानंतर त्याबाबत आमच्याकडे डिलीव्हरी चलन व बिल असते व त्या खरेदी घेणाऱ्या व्यक्तीला त्याची प्रत दिली जाते. खरेदी घेणाऱ्या व्यक्तीची डिलीव्हरी चलनावर सही घेतली जाते. साक्षीदार पुन्हा सांगतो की, त्यावर ड्रायव्हरची सही घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुतकामी आरोपीला माल विकल्याबाबतचे त्याच्या सहीचे डिलीव्हरी चलन मी दाखल केले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, तो ते दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने अशा प्रकारचा कोणताही माल खरेदी न केल्यामुळेच तसे डिलीव्हरी चलन मी प्रस्तुतकामी दाखल केले नाही.

**मध्यंतराची वेळ झाल्यामुळे उलटतपास दुपार सत्रापर्यंत तहकुब**

**दुसऱ्या सत्रात उलटतपास शपथेवर सुरु**

६. आमच्या फर्मचे दरवर्षीचे नफा–तोटा रजिस्टर मेनटेन केले जाते. हे म्हणणे खरे आहे की त्यामध्ये कोणाकडून किती रक्कम येणे बाकी आहे हे देखील नमूद केलेले असते. आमच्या फर्मच्या नफा–तोटा रजिस्टरमध्ये आरोपी कडून रक्कम रुपये ३,०१,०००/– येणे आहे असे नमूद केले आहे. ते रजिस्टर सदर प्रकरणात मी पुढील तारखेस दाखल करण्यास मी तयार आहे. मी इनकम टॅक्स भरतो. हे म्हणणे खरे आहे की त्यामध्ये देखील येणे असलेल्या रकमेचा उल्लेख

केला जातो. ते देखील दाखल करण्यास मी तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की मी प्रस्तुतकामी माझे इनकम टॅक्स रिटर्न आणि नफा–तोटा पत्रक दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीकडून माझे कोणतेच येणे शिल्लक नसल्यामुळे मी माझे इनकम टॅक्स रिटर्न आणि नफा–तोटा पत्रक प्रस्तुतकामी दाखल केले नाही.

७. सदरची फिर्याद मी फर्मच्या वतीने दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या फिर्यादमध्ये व पुराव्याच्या शपथपत्रामध्ये सदरची फिर्याद गौतमकुमार जवेरीलाल फर्मकरीता दाखल केली आहे असे कुठेही नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर फिर्यादवर मी गौतमकुमार जवेरीलाल डूंगरवाल म्हणून सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर फिर्यादवर मी गौतमकुमार जवेरीलाल डूंगरवाल फर्मचा प्रोप्रायटर म्हणून सही केलेली नाही.

**प्रश्न–** गौतमकुमार जवेरीलाल फर्मने तुम्हाला सदरची फिर्याद दाखल करण्यासाठी व पुरावा देण्यासाठी कोणतेही अधिकार पत्र दिले नाही?

**उत्तर–** सदर फर्मचा मीच प्रोप्रायटर असल्यामुळे अधिकार पत्राची गरज नाही.

८. सदर प्रकरणातील चेक गौतमकुमार जवेरीलाल फर्मच्या नावे दिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की माझ्या फिर्यादमध्ये व पुराव्याच्या शपथपत्रामध्ये कुठेही असे नमूद नाही की, सदरचा चेक गौतमकुमार जवेरीलाल फर्मच्या नावे देण्यात आलेला होता. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला जी नोटीस पाठविली त्यावर गौतमकुमार जवेरीलाल फर्मचा प्रोप्रायटर म्हणून मी सही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला मी पाठविलेली नोटीस मिळाली नाही. हे म्हणणे खरे नाही की गौतमकुमार जवेरीलाल या फर्मने आरोपीला कोणतीही नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रस्तुत प्रकरणातील दाखल चेक मला आरोपीने दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की निशाणी ४४ वरील चेक वर

आरोपीची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे आरोपीकडून कोणतेही कायदेशीर घेणे नाही.

९. मी आर्यन एक्सपोर्टचे प्रोप्रायटर आकाश यादव यांना ओळखतो. मी विकास कन्होजिया यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी आकाश यादवकडे कामाला होता. हे म्हणणे खरे नाही की आरोपी जेव्हा आकाश यादवकडे काम करायचा तेव्हा सदरचा वादातीत चेक मला आकाश यादवने दिलेला आहे.हे म्हणणे खरे आहे की आकाश यादवकडून मला काही रक्कम येणे बाकी आहे. हे म्हणणे खरे आहे की आकाश यादवविरुद्ध मी याच न्यायालयात दावे दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की आकाश यादवने मला दिलेल्या चेकचा गैरवापर करुन मी आरोपीविरुद्ध सदरची खोटी फिर्याद दाखल केलेली आहे.

१०. हे म्हणणे खरे नाही की आरोपीकडून मला रक्कम रुपये ३,०१,०००/- येणे आहे व त्यासाठी आरोपीने मला चेक क्र. ५२२२३५ दिल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी दि.०५.०९.२०१८ रोजीचा चेक रिटर्न मेमो प्रस्तुतकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की दि.०५.०९.२०१८ रोजी चेक न वटता परत आल्याबाबत मी आरोपीला नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की दि.०५.०९.२०१८ रोजी चेक न वटता परत आल्यावर मी त्याबाबत आरोपीशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून विचारणा केली ते दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा प्रस्तुतकामी दाखल केला नाही.

११. हे म्हणणे खरे नाही की केवळ मुदतीत केस दाखल करता यावी म्हणून अशा प्रकारचे कथन मी माझ्या फिर्यादमध्ये केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने सदरचा चेक देऊन माझी फसवणूक केल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की दि.०१.११.२०१८ रोजी मी वकीलांमार्फत आरोपीला नोटीस पाठविली व ती नोटीस आरोपीला मिळाल्याचे मी खोटे कथन केले आहे.हे

म्हणणे खरे नाही की आरोपीला मी पाठविलेली नोटीस मिळाल्याबाबत पोहोच पावती दाखल केली आहे ती खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीविरुद्ध सदरचे खोटे प्रकरण दाखल केले असून आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.12.08 17:28:13 +0530

**दिनांक – ०८/१२/२०२५** **( वृषाली दी. सुंगारे)**

**ठिकाण –चांदवड.** **सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**क.स्तर चांदवड.**